# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य.

महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई. ४०० ००१.

दूरध्वनी क्र. २२६१७९६९ फॅक्स क्र. २२६९०००७

E-mail: desk18@dtemaharashtra.gov.in Internet : http://www.dtemaharashtra.gov.in


**संकेतस्थळ : परिपत्रक** का.क्र.१८/तंशिसं/संस्था-संकेतस्थळ-पत्र/२०१८/८९

**कालमर्यादित-** दिनांक:- ०७/०३/२०१८

प्रति,
सर्व संबंधीत संस्थाचे प्राचार्य / संचालक / अधिष्ठाता,
(मान्यताप्राप्त तांत्रिक व व्यावसायिक पदविका पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणा-या संस्था)

**विषय :- सन २०१८-१९ साठी** National Scholarship Portal **वरील केंद्रशासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजनांसाठी नविन महाविद्यालयांच्या/ संस्थांच्या नाव नोंदणीबाबत.... (अंतिम दिनांक ३१/०३/२०१८)**

उपरोक्त विषयाबाबत कळविण्यात येते की, अल्पसंख्यांक कार्यमंत्रालय, नवी दिल्ली यांचे दिनांक ०८/०२/२०१८ च्या ई-मेल नुसार केंद्र शासन पुरस्कृत शिष्यवृत्ती योजना सन २०१८-१९ च्या अंमलबजावणीसाठी ज्या महाविद्यालय / संस्थेचे नाव National Scholarship Portal (संकेतस्थळ : www.scholarships.gov.in ) च्या होमपेज वरील **Search Institute / School / ITI** या लिंकवर गेल्यानंतर दिसत नसेल अशा महाविद्यालयांनी / संस्थांनी त्यांचे महाविद्यालय / संस्थेचे नाव नोंदणी दिनांक ३१/०३/२०१८ पर्यंत करणे आवश्यक आहे.

दिनांक ३१/०३/२०१८ नंतर सदर पोर्टलवरील नवीन नाव नोंदणीसाठीची प्रक्रिया बंद होणार आहे. त्यामुळे विहीत मुदतीनंतर नाव नोंदणीसाठी या संचालनालयाकडे महाविद्यालयांची / संस्थांची माहिती प्राप्त झाल्यास त्यावर कोणतीही कार्यवाही करता येणार नाही. याची नोंद घ्यावी, तरी सदर केंद्र शासनाच्या **गुणवत्ता - नि -साधन शिष्यवृत्ती** साठी पात्र असलेल्या व्यावसायिक पदवी / पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम चालविणाऱ्या ज्या महाविद्यालयाचे / संस्थेचे नाव सदर पोर्टलवर दिसत नाही अशा महाविद्यालयांनी / संस्थांनी नाव नोंदविण्यासाठी संस्थेच्या लेटरहेडवर खालील प्रपत्रात माहीती भरुन व संस्था रजिस्टर्ड पत्राची (सक्षम प्राधिका-याने दिलेले प्रमाणपत्र उदा. **AICTE, MCI** इ.) स्कॅन कॉपी (not more than 100 KB) सोबत **खास दुता मार्फत** तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अल्पसंख्याक कक्षात जमा करावी. (संस्थानी लेटरहेडवर संस्थेचे नाव **NSP Portal** वर रजिस्टर नाही असे स्पष्टपणे लिहून माहिती भरुन द्यावी. )

**केंद्र शासनाची गुणवत्ता - नि -साधन शिष्यवृत्ती (मेरीट - कम - मिन्स) योजना**

| Information of Institute for **New Registration** on the letter head of the Institute **( Merit – Cum – Means scholarship of GoI on National Scholarship Portal )** | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| AISHE (All India Survey on Higher Education) Code (ex. C-XXXXX) | Insitute State Education Code, if any(i.e. DTE/DMER/ DHE Code etc.) | Institute Name | Affiliated University | Name of the UG/PG level courses (ex-B.E., MBA, etc.) | Name of Course Approving Apex Body (i.e. AICTE , PCI , COA , MCI , DCI etc. | Institute complete Address with Pincode and contact details. | The Principal / Director's Details ( on which Login_id and Password will be sent ) | | |
| | | | | | | | Name | Email-id | Mobile No. |
| | | | | | | | | | |

( डॉ. अभय वाघ. )
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म. रा. मुंबई.

टीप – व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम हा केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्तीअंतर्गत येत असल्याने सदर व्यावसायिक पदविका अभ्यासक्रम चालविणाऱ्या संस्थांनी संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, पुणे यांच्याशी संपर्क साधावा. (संकेतस्थळ : www.dhepune.gov.in )

प्रत -

१) मा. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, सेंट जॉर्ज हॉस्पिटल आवार, सीएसटी रेल्वे स्टेशनजवळ, मुंबई ४००००१ यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

२) मा. संचालक, महाराष्ट्र कृषि शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

३) कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, म्हसरुळ, वणी दिंडोरी रोड, नाशिक – ४२२ ००४. यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

४) कुलसचिव, महाराष्ट्र पशुविज्ञान विद्यापीठ, फुटाला लेक, नागपूर – ४४० ००१ यांना माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी.

५) सहसंचालक, तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपूर, अमरावती, नाशिक, औरंगाबाद यांना माहितीसाठी व त्यांच्या संकेतस्थळावर जाहिर करण्यासाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

***************